# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/१०/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## पो.स्टे. कुही हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई :—

दिनांक २०/१०/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड विभागात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोस्टे कुही हद्दीत येथील मौजा वडेगाव (काळे) ता. कुही परिसरात काही लोक ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पथकाने पोस्टे कुही हद्दीत येथील मौजा वडेगाव (काळे) ता. कुही परिसरात जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे— १) प्रविण उर्फ गुड्डू नारायण चौधरी वय ५७ वर्ष रा. प्रतापनगर नागपूर, २) विपुल भिमराव बोरकर वय ३५ वर्ष रा.अजितनाथ सोसायटी बेसा नागपूर ३) निलेश पुरुषोत्तम ठाकरे वय ४० वर्ष रा. न्यू सुभेदार लेआउट नागपूर ४) राजेश बाबुराव समर्थ ४५ रा. दुर्गा नगर मानेवाडा नागपूर ५) पराग महादेवराव लांजेवार वय ४२ वर्षे राहणार नाईक रोड महाल नागपूर** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन १) ५२ तासपत्ते असलेले दोन कॅट व डावावरील व नगदी ४२३५०/— रुपये २) दोन मोबाईल फोन किंमत २१०००/— रुपये ३) इलेक्ट्रॉनिक मोपेड चेतक बजाज कंपनीची किमती १,००,०००/—रुपये असा एकूण किंमत १,६३,३५०/— रु चा मुद्देमाल जप्त करून वरील ५ आरोपी व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कुही पाचगाव चौकी यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपीतांविरुद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, चै बद्दुलाल पांडे, भ्ब आशिष भुरे, पोहवा मयूर ढेकले, पोहवा सत्यशील कोठारे, पोशी रोहित आडे, पोशी सुमित बांगडे, पोशि धोंडूतात्या देवकते यांनी पार पाडली.

# पोस्टे काटोल हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २०/१०/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, काटोल हद्दीतील सिख मोहल्ला पंचवटी काटोल, खानगाव शिवार, डोंगरगाव येथे काही इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन सिख मोहल्ला पंचवटी काटोल, खानगाव शिवार, डोंगरगाव येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे **आरोपी नामे— १)** जोगेंदरसिं कमरसिंग भादा वय ५५ वर्ष रा. सिख मोहल्ला पंचवटी काटोल  काटोल जि. नागपुर **व ०२ महिला आरोपी** हे दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळतांना दिसुन आले. आरोपीचे ताब्यातून १) ६२ लीटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५१००/— रू. २) ३७०० लीटर मोहाफुल सडवा रसायन एकुण किंमती १२९५००/— रू. ३) इतर साहित्य किंमती ४५००/— रू. असा एकुण १३९१००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीतांविरुद्ध पो.स्टे काटोल येथे कलम ६५ (एफ), (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोनि निशांत मेश्राम, सपोनि शिवाजी नागवे, पोहवा पवन वाघमारे, पोना विकास वाईलकर व इतर स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर